Impact Factor – 3.452

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY


Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February-2018

SPECIAL ISSUE-XXXVIII

## CHANGES IN TAX SYSTEM AND INDIAN ECONOMY




**Guest Editor :**
Dr. Ujjwala Deore
Principal,
Smt. Pushpatai Hiray Arts, Sci. & Comm.
Mahila Mahavidyalaya, Malegaon Camp, Dist. Nashik

**Chief Editor :**
Dr. Dhanraj T. Dhangar
Dept. of Marathi,
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist. Nashik (MS) India.

**Executive Editor :** Mr. Mahadev Kshirsagar, Dr. Rajani Sawant & Dr. Meena Patil
Smt. Pushpatai Hiray Arts, Sci. & Comm. Mahila Mahavidyalaya,
Malegaon Camp, Dist. Nashik (MS) India.

**This Journal is indexed in :**

- UGC Approved Journal List No. 40705 & 44117
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

RESEARCH JOURNEY

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned with OKEN Scanner

# INDEX


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Indirect Taxation in India: Reforms for Economic Prosperity | Dr. Ritesh Kumar Singhal | 05 |
| 2 | Advantages and Disadvantages of GST in India | Dr. G. D. Kharat | 10 |
| 3 | Is GST A Bugbear for Indian Customers? | Ruby Gandhi | 15 |
| 4 | Impact of GST on Industries | Dr. Somnath Sanap | 19 |
| 5 | Role of GST in Modern Indian Economic Era | Dr. G. L. Shendge, Prof. G. T. Pawar | 22 |
| 6 | GST India Indirect Tax Reforms | Dr. Sunil Ghuge | 24 |
| 7 | Impact of Goods and Services Tax on Indian Economy - with reference to Agriculture sector | Mr. B. S. Pawar | 29 |
| 8 | GST- Structure, Impact and Future | Mr. D. P. Kamble | 34 |
| 9 | GST and Its Advantages and Disadvantages: A Study of Nashik City | Dr. Vijaykumar Wawle | 36 |
| 10 | GST Council : An Overview | Prof. Rizwana Hamdani | 43 |
| 11 | 'Goods and Services Tax (GST) -- Its Impact on Consumers' | Prof. Vitthal Sadafule | 48 |
| 12 | Impact of Goods and Service Tax on Indian Industry | Dr. Ajaykumar Palwe | 52 |
| 13 | Problems of Indian Tax System | Dr. H. M. Kshirsagar, Dr. M. V. Jagtap | 56 |
| 14 | Goods and Service Tax (GST) and Indian Economy | Dr. N. C. Pawar | 62 |
| 15 | Revolution in the Tax System of India | Dr. D. R. Bachhav, Dr. Smt. Meena Patil | 66 |
| 16 | GST-Industry and Service Sector | Dr. Arti Lokhande | 71 |
| 17 | A Study on Impact of GST on Indian Economy | Dr. Vaijayanti Rathi | 76 |
| 18 | वस्तू व सेवा कराचे फायदे व त्यातील उणीवा | डॉ. नारायण गाढे | 81 |
| 19 | वस्तू व सेवा कराचे फायदे : एक दृष्टीक्षेप | प्रा. देवानंद मांडवधरे | 87 |
| 20 | जीएसटी आणि लघु व मध्यम उद्योग | डॉ. रजनी सावंत | 90 |
| 21 | जीएसटी आणि ग्राहक | डॉ. चंद्रकला शेवाळे | 93 |
| 22 | जीएसटी : भारतीय कर प्रणालीतील एक बदल | प्रा. एम. व्ही. हिरे | 96 |
| 23 | भारतीय कर प्रणाली | प्रा. अरुण शिंदे | 100 |

| | | |
|---|---|---|
| 24 | जी. एस. टी. - फायदे व परिणाम<br>प्रा.उदय टेके | 105 |
| 25 | वस्तू व सेवा कर : एक आर्थिक क्रांती<br>प्रा. महादेव क्षीरसागर | 111 |
| 26 | मुघलकालीन जमीन महसूल पद्धती<br>प्रा. जितेंद्र पगार | 114 |
| 27 | भारतीय अर्थव्यवस्थेत वस्तू व सेवा कराची भूमिका<br>प्रा. मनोज देशमुख | 117 |
| 28 | भारताच्या कर प्रणालीतील सुधारणा – जीएसटी<br>डॉ. बी.एम.सोनवणे | 120 |
| 29 | कर व्यवस्थेचे ऐतिहासिक अवलोकन<br>प्रा. विजय मांटे | 123 |
| 30 | वस्तू व सेवा कर : एक दृष्टीक्षेप<br>श्रीमती शिल्पा यन्नावार | 127 |
| 31 | वस्तू व सेवा कर आणि भारतीय अर्थव्यवस्था<br>डॉ. अनिल वाडकर | 130 |
| 32 | वस्तू व सेवा कराचे सामाजिक जीवनावर होणारे परिणाम<br>प्रा. हर्षवर्धन जाधव | 135 |
| 33 | वस्तू व सेवा कर : एक मूल्यमापन<br>प्रा. धनंजय पगारे | 140 |


*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the pap are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

**- Executive Editor-**

**Published by -**

- **Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Nashik**
  **Email :** swatidhanrajs@gmail.com

# भारतीय करप्रणाली

**प्रा. अरुण हिम्मतराव शिंदे**
राज्यशास्त्र विभाग
श्रीमती पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालय,
मालेगाव कॅम्प, मालेगाव (नाशिक)

**प्रास्ताविक :**

आपण आपल्या दैनंदिन जीवनात कोणत्या ना कोणत्या प्रकारे कर भ्रत असतो. सरकारच्या विविध योजनांना अर्थसाहाय्य करण्यामध्ये आपण भरत असलेल्या या कराची भूमिका महत्त्वाची असते. सरकारला अनेक जबाबदाऱ्या पार पाडायच्या असतात. यामध्ये कायदा सुव्यवस्था राखणे, सार्वजनिक माल आणि सेवा उपलब्ध करुन देणे, सामाजिक आणि भौतिक पायाभूत सुविधा निर्माण करणे, देशातील लोकसंख्येला शिक्षण उपलब्ध करुन देण्यासाठी शिक्षणामध्ये गुंतवणूक करणे, दारिद्र्य निर्मूलन करणे इत्यादींचा त्यात समावेश असतो. साहजिकच सरकारला अशा अनेक प्रकारच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी विशिष्ट रक्कम उभारुन देतील असे आर्थिक स्त्रोत निर्माण करावे लागतात. सरकार आपल्या विविध योजनांना अर्थसाहाय्य करण्यासाठी असे आर्थिक स्त्रोत मुख्यत्वे कर, उपभोक्ता शुल्क/सेवा शुल्क आणि कर्ज यांच्या माध्यमातून निर्माण करते. निधीचे जे स्त्रोत तिजोरीवर उत्तरदायीत्व निर्माण करत नाहीत किंवा मालमत्तेमध्ये घट करत नाहीत. (उदा. निर्गुंतवणूक) त्यांना भांडवली प्राप्ती म्हणतात. अशा प्रकारे कर आणि वापर शुल्क / सेवा शुल्क ही सरकारच्या महसूल प्राप्तीची काही उदाहरणे आहेत तर कर्जे ही भांडवली प्राप्ती आहेत.

**कर महसूल आणि बिगर-कर महसूल :**

सरकारच्या महसूल प्राप्तीची कर महसूल आणि बिगर-कर महसूल अशी आणखी दोन भागात विभागणी करता येऊ शकते.

RESEARCH JOURNEY

दोन महसूलः सरकारने लागू केलेल्या कायद्यामुळे सरकारकडे चुकत्या केल्या जाणाऱ्या देयकांच्या माध्यमातून जमा होणाऱ्या पैशाला कर समजले जाते.

बिगर-महसूल करः बिगर-कर महसूल म्हणजे सरकारकडे करांव्यतिरिक्त शुल्क/वापर आकार, डिव्हिडंड आणि सार्वजनिक क्षेत्रातील आस्थापनांना झालेला लाभ, व्याजाची प्राप्ती, दंड इ. साधनांच्या माध्यमातून जमा होणारा महसूल. जगभरातील अनेक देशांमध्ये कर महसूल म्हणजे सरकारकडे जमा होणाऱ्या महसुलाचा एक मोठा भाग असतो.

**प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर :**

करांची विभागणी प्रामुख्याने दोन प्रकारांमध्ये करता येते.

थेट करः करांचा भार थेट एका अशी व्यक्ती किंवा आस्थापनेवर पडतो जिच्यावार कर आकारला जातो अशा करांना प्रत्यक्ष कर म्हणतात. दुसऱ्या शब्दात एक अशी बाब जी एक अशा प्रकारचा थेट कर सरकारकडे भरत असते ज्या कराचा भार तिला सहन करावा लागतो आणि त्याचा भार ती अन्यत्र वळवू शकत नाही. प्रत्यक्ष कर उत्पन्नावर, मालमत्तेवर आणि संपत्तीवर आकारले जातात. दुसरीकडे अप्रत्यक्ष कर म्हणजे असे कर ज्यांच्यासाठी कराचा भार दुसऱ्यावर किंवा इतर व्यक्तींवर नंतर मालाच्या / सेवांच्या व्यापाराच्या व्यवहारांद्वारे वळवता येऊ शकतो. हे कर अप्रत्यक्ष कर समजले जातात कारण या करांचा भार ज्याला सहन करावा लागतो त्या मध्यस्थावर या

ISSN : 2348-7143
February 2018

कराची थेट आकारणी झालेली नसते. अप्रत्यक्ष करांमध्ये सीमाशुल्क, उत्पादन शुल्क, सेवा कर आणि विक्री कर / मूल्यवर्धित कर (व्हॅट) यांचा समावेश होतो.

**भारतातील प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करांचे प्रकार :**

एखाद्या अर्थव्यवस्थेमध्ये विविध प्रकारचे उत्पन्न, उत्पादन आणि मालाची व सेवांची विक्री यांवर आकारण्यात येणारे आणि सीमेपलीकडे होणाऱ्या मालाची ने-आण यांच्यावर लागू होणारे इतर कर अशा प्रकारचे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष असे दोन्ही प्रकारचे कर अस्तित्वात असतात. भारतामध्ये अस्तित्वात असलेल्या विविध प्रकारच्या काही करांचे उदाहरण खाली दिलेले आहे.

**प्रत्यक्ष कर :**

- **कॉर्पोरेशन टॅक्स :**

हा कर नोंदणीकृत कंपन्या / देशातील बड्या आस्थापना (राष्ट्रीय किंवा बहुराष्टीय / परदेशी असू शकतात). भारतातील राष्ट्रीय कंपन्यांवर त्यांच्या एकंदर उत्पन्नाच्या आधारे, उत्पन्नाचा स्त्रोत व मूळ विचारात न घेता करांची आकारणी केली जाते. तर परदेशी कंपन्यांच्या निव्वळ भारतातील व्यवहारांतून निर्माण होणाऱ्या उत्पन्नावर करांची आकारणी केली जाते.

- **उत्पादन शुल्क :**

हा एक असा कर आहे ज्याची आकारणी भारतात तयार होणाऱ्या व स्थानिक वापारासाठी असलेल्या मालावर होते.

- **वैयक्तिक उत्पन्नावर कर :**

व्यक्ती, मोठ्या कंपन्यांशिवाय इतर आस्थापना यांच्यावर प्राप्तिकर कायदा १९६१ नुसार हा कर आकारला जातो.

RESEARCHJOURNEY

- **शेअर व्यवहार कर :**

प्रत्यक्ष करांमध्ये शेअर व्यवहार कर यांसारख्या करांचाही समावेश होतो ज्याची आकारणी नोंदणीकृत नियामकांच्या व्यवहारांवर होते जे शेअर बाजार आणि म्युच्युअल फंडांच्या युनिटमध्ये होतात.

- **कॅपिटल गेन्स टॅक्स :**

एखाद्या भांडवली मालमत्तेच्या म्हणजे विक्रीतून मिळणाऱ्या नफ्यावर एखाद्या भांडवली मालमत्तेच्या विक्रीतून मिळणाऱ्या नफ्यावर (भौतिक व आर्थिक) म्हणजे एखाद्या करदात्याकडे असलेली चित्रे, दागिने व आभूषणे, शेअर, म्युच्यल फंड इ. कॅपिटल गेन्स म्हणून अल्पकालीन किंवा दीर्घकालीन करआकारणीसाठी पात्र आहेत, कॅपिटल गेन किंवा एकूण नफा जो करआकारणीसाठी पात्र असतो तो म्हणजे मुख्यतः त्या वस्तूची विक्री किंमत व त्या वस्तूची विक्री करतानाची किंमत व तिची बाजारातील खरेदी यामधील फरकाइतकी असते. ज्या वर्षात या भांडवली मालमत्तेची विक्री होते त्या वर्षात हा कर लागू होतो.

- **संपत्ती कर :**

व्यक्ती आणि कंपन्यांसह विशिष्ट व्यक्तींच्या विशिष्ट मालमत्तेवर हा कर संपत्ती कर कायदा १९५७ अंतर्गत आकारला जातो. हा कर उत्पादित मालमत्तेवर लागू होत नाही. म्हणूनच शेअर्स, डिबेंचर्स, युटीआय म्युच्युइल फंडस् इत्यादींवर या कराची आकारणी होत नाही. मात्र, २०१५-१६ मध्ये हा कर रद्द करण्यात आला आणि त्याच्या जागी सुपर रिच म्हणजे अतिश्रीमंत व्यक्तींवर अतिरिक्त अधिभार लावण्यात आला.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 38 : Changes in Tax System & Indian Economy
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018

- **मालमत्ता कर :**
  भारताच्या प्राप्तीकर कायद्यानुसार मालमत्तांमधून मिळणारे उत्पन्न उत्पन्नांच्या प्रमुख स्त्रोतांपैकी एक मानले जाते. म्हणूनच मालमत्तांच्या उत्पन्नावर कर आकारला जातो. साधारणपणे यामध्ये इमारती, फ्लॅट्स, दुकाने आणि जमीन इत्यादींचा समावेश होतो.

**अप्रत्यक्ष कर :**

- **उत्पादन शुल्क :**
  हा एक असा कर आहे ज्याची आकारणी भारतात तयार होणाऱ्या व स्थानिक वापरासाठी असलेल्या मालावर होते.

- **विक्री कर :**
  सामान्यतः याची आकारणी त्या ठिकाणी होते जिथे विशिष्ट करपात्र मालाची खरेदी किंवा अलदाबदल होत असते. संपूर्ण उत्पादनाच्या एकूण मूल्याचा काही टक्के अशी याची आकारणी होत असते.

- **मूल्यवर्धित कर (व्हॅट) :**
  मूल्यवर्धित कर बहुस्तरिय कर आहे. ज्याची आकारणी पुरवठा साखळीच्या वेगवेगळ्या टप्प्यावर भर पडणाऱ्या मूल्याच्या आधारे विक्रीमूल्यावर केली जात नाही. करदात्यांना आधीच चुकत्या केलेल्या कराचा परतावा पुरवठा साखळीतील आधीच्या टप्प्यातील माहितीद्वारे मिळतो.

- **सेवा कर :**
  एखादी व्यक्ती अथवा कंपनीने दिलेल्या सेवेवर हा कर लावला जातो आणि हा भरण्याची जबाबदारी ही सेवा पुरवणाऱ्यावर असते.

- **सीमा शुल्क :**
  देशामध्ये आयात केल्या जाणाऱ्या आणि त्याचबरोबर निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर हा कर लावला जातो.

**केंद्र आणि राज्य सरकारे यांच्यात कर आकारणीच्या अधिकाराची विभागणी :**

भारताच्या राज्यघटनेने अतिशय स्पष्टपणे करआकारणीच्या अधिकारांची विभागणी प्रशासनाच्या विविध पातळ्यांवर केलेली आहे. अशा प्रकारे कर आणि शुल्क आकारणीच्या अधिकारांची विभागणी सरकारांमध्ये तीन टप्प्यांवर केलेली आहे. ती म्हणजे केंद्र सरकार, राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्था.

कॉर्पोरेशन आणि वैयक्तिक उत्पन्नावर कर आकारण्याचे अधिकार (कृषि उत्पन्नावरील कराशिवाय, कारण हा कर राज्य सरकारे आकारु शकतात) जास्त करुन केंद्र सरकारकडे असतात. अप्रत्यक्ष करांच्या अस्तित्वाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारकडे उत्पादनावरील किंवा निर्मितीवरील उत्पादन शुल्क आणि पुरवल्या जाणाऱ्या सेवांवर सेवाकर असे व्यापक कर आकारणीचे अधिकार आहेततर राज्यांकडे मालाच्या विक्रीवर कर आकारण्याचे आणि इतर काही कर आकारण्याचे अधिकार आहेत. केंद्र सरकार आकारत असलेल्या अप्रत्यक्ष करांमध्ये सीमाशुल्क, केंद्रीय उत्पादन शुल्क, विक्री कर आणि सेवा कर यांचा समावेश आहे.

राज्य सरकारांना विक्री कर, मुद्रांक शुल्क / स्टॅम्प ड्युटी (मालमत्ता हस्तांतरणाचे शुल्क, राज्य उत्पादन शुल्क (अल्कोहोल उत्पादनांवरील शुल्क जमीन महसूल (शेतीसाठी वापरलेल्या जमिनीवरील शुल्क), मनोरंजन शुल्क आणि व्यवसायांवरील कर हे कर आकारण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे. राज्य सरकारांकडून आकारण्यात येणाऱ्या विक्री कर प्रणालीची जागा २००५ मध्ये ज्या वेळी सर्व राज्य सरकारे व्हॅट प्रणालीमध्ये आली तेव्हापासून मूल्यवर्धित कराने घेतलेली आहे.

ISSN : 2348-7143
February 2018

स्थानिक स्वराज्य संस्थांना मालमत्तेवर (इमारती, इ.), ऑक्ट्रॉय (उपयोगासाठी/वापरासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात प्रवेशावर असलेला कर), बाजारांवर कर आणि पाणीपुरवठा, सांडपाणी वहन इ. सारख्या सोयीसुविधांवरील कर/वापर शुल्क अशा प्रकारचे कर आकारण्याचे अधिकार दिले आहेत. गेल्या काही वर्षात अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ऑक्ट्रॉय रद्द केला आहे.

**केंद्रीय कर प्रणाली अंतर्गत संकलित केलेल्या महसुलाचे वितरण :**

अनेक कारणांमुळे केंद्र आणि राज्य सरकारांमध्ये करआकारणीचे अधिकार आणि खर्चांच्या जबाबदाऱ्यांमध्ये असंतुलन निर्माण होते. या समस्येचे निराकरण करण्यासाठी दर पाच वर्षांनी एका वित्त आयोगाची स्थापना करण्यात येते. केंद्र आणि राज्य सरकारे यांच्यात आर्थिक स्त्रोतांची विभागणी कशी करायची याची शिफारस करण्याचे काम या आयोगाकडे असते. केंद्र सरकारच्या कर प्रणालीमध्ये जमा झालेल्या महसुलापैकी बऱ्याच मोठ्या भागाच्या विभागणीशी त्याचा संबंध असतो. सध्या सर्व केंद्रीया करांच्या माध्यमातून जमा झालेला महसूल, सेस, अधिभार आणि केंद्रशासित प्रदेशांचे कर वगळता केंद्रीय करांच्या माध्यामतून जमा झालेल्या किंमतीइतकी रक्कम ही विभागणी करण्याजोगी / केंद्रीय कर महसुलाच्या साठ्याला विभागण्याजोगी समजली जाते. १४ व्या वित्त आयोगाने (१ एप्रिल, २०१५ पासून लागू झालेल्या) दरवर्षी केंद्रीय कर महसुलाच्या विभागणी करण्याजोग्या/विभागण्याजोग्या साठ्याच्या ४२ टक्के वाटा राज्यांना देण्याची शिफारस केली आहे आणि केंद्राने उर्वरित रक्कम केंद्रीय अर्थसंकल्पासाठी राखून ठेवायची आहे.

**कर-जीडीपी गुणोत्तर आणि भारतातील करांची प्रागतिकता :**

एखाद्या देशाचे कर-जीडीपी अर्थात कर आणि राष्ट्रीय उत्पन्नाचे गुणोत्तर एक महत्त्वाचा निर्देशांक मानला जातो ज्यामुळे सरकारकडून अर्थव्यवस्थेच्या आकारमानाच्या तुलनेत किती प्रमाणात कर महसूल जमा केला जात आहे याची माहिती मिळण्यास मदत होते. उच्च कर-जीडीपी गुणोत्तर असल्यास सरकारला अर्थसंकल्पात अधिक मोकळीक मिळते जेणेकरुन कोणतेही कर्ज न घेता सरकारला जास्त खर्च करता येतो. मात्र, भारताच्या अनेक वर्षांपासुन सुरु असलेल्या उच्च वृध्दीनंतरही भारताचे कर-जीडीपी गुणोत्तर अल्प राहिलेले आहे. ते इतके कमी आहे की ब्रिक्स देशांमध्ये भारताचे कर-जीडीपी गुणोत्तर सर्वात तळाला आहे. म्हणूनचे हे गुणोत्तर सुधारण्याची गरज आहे.

भारताच्या संरचनेचा आणखी एक पैलू म्हणजे त्यातील प्रागतिकतेचा अभावा होय. जे कर तुलनेने सर्वात जास्त भार (त्यांच्या वापराशी किंवा उत्पन्नाशी असलेला संबंध) उच्च उत्पन्न गटांपेक्षा अल्प उत्पन्न गटावर टाकतात त्यांना प्रतिगामी (रिग्रेसिव) कर असे म्हटले जाते. त्यामुळेच अप्रत्यक्ष करांना प्रतिगामी कर समजले जाते कारण श्रीमंत आणि गरीब यांना ते वापर करत असलेल्या मालासाठी सारखाच कर भरावा लागतो. दुसरीकडे प्रत्यक्ष करांना पुरोगामी (प्रोग्रेसिव) कर समजले जाते कारण ते करदात्याच्या कर भरण्याच्या क्षमतेशी संबंधित असतात आणि कराचा सरासरी दर करदात्याच्या उत्पन्नातील वाढीनुसार वाढत जातो. भारतामध्ये एकूण जमा झालेल्या करापैकी (केंद्र व राज्यांचा) ६० टक्यांहून अधिक कर अप्रत्यक्ष करांमधून जमा होतो. म्हणजे यातून असे सूचित होते की ही करप्रणाली अतिशय प्रतिगामी आहे.

**करातील सुधारणा :**

गेल्या काही वर्षात करांमध्ये अनेक प्रकारच्या सुधारणा झाल्या आहेत. विशेषतः अप्रत्यक्ष करप्रणालीमध्ये सरकारने बदलांची प्रक्रिया सुरु केली आहे. भारताला अधिक कर-अनुकूल बनवण्याबरोबरच कर प्रणालीमधील गुंतागुंत आणखी कमी करण्याचा त्यामागे उद्देश आहे. यापैकी सर्वात मोठ्या सुधारणेसाठी केलेला पाठपुरावा म्हणजे